खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे

# हुतात्मा राजगुरू महाविद्यालय

राजगुरुनगर, ता. खेड, जि. पुणे

## प्रसिद्धी विभाग

## शैक्षणिक वर्ष : २०२३ – २४

## मराठी विभाग : भाषा गौरव दिन

पुढारी

# विद्यार्थ्यांनी भाषिक कौशल्ये आत्मसात करावी

## ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील यांचा सल्ला

**राजगुरुनगर : पुढारी वृत्तसेवा**

तंत्रज्ञानाच्या युगात मराठी विषयाचे शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांनी वाचन, लेखन, संभाषण, श्रवण ही भाषिक कौशल्ये आत्मसात करून व्याख्याता, निवेदक, सूत्रसंचालक या क्षेत्रात करिअरच्या संधी शोधाव्यात, असे आवाहन खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील यांनी केले.

ते हुतात्मा राजगुरू महाविद्यालयातील मराठी विभागाच्या वतीने आयोजित मराठी भाषा गौरव दिनानिमित्त 'माझे आनंद पर्यटन' या विशेषांकाच्या प्रकाशन कार्यक्रमात बोलत होते. या प्रसंगी उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, संचालक शांताराम घुमटकर, डॉ. अनिल खिंवसरा, सुरेश टाकळकर, विजय वाडेकर, बाळासाहेब लिंभोरे, प्राचार्य डॉ. एस. एस. पिंगळे, डॉ. एच. एम. जरे, उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे उपस्थित होते.

ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील म्हणाले, ज्ञान व वाचन यांचा जवळचा संबंध असून वाचन माणसाला वैचारिकदृष्ट्या समृद्ध करते. विद्यार्थ्यांना वाचनातून मिळालेल्या माहितीचे ज्ञानात रूपांतर करता यायला हवे. वाचनाचा संस्कार जपणारी भावी पिढी घडण्यासाठी मराठी विभाग करीत असलेल्या प्रयत्नांबद्दल त्यांनी आनंद व्यक्त केला.

प्राचार्य डॉ. एस. एस. पिंगळे यांनी विद्यार्थ्यांना सोशल मीडियाच्या आहारी न जाता वाचन संस्कृती रूजविण्याचे आवाहन केले. मराठी विभागप्रमुख डॉ. संजय शिंदे यांनी 'माझे आनंद पर्यटन' या विशेषांकातून विद्यार्थ्यांनी त्यांच्या पर्यटनाच्या आठवणींना उजाळा दिला असल्याचे सांगितले. या प्रसंगी मराठी विभागाच्या वतीने स्वरचित काव्यलेखन, शब्दकोडे सोडवा, काव्यवाचन व निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले.प्रास्ताविक व सूत्रसंचालन डॉ. संजय शिंदे यांनी केले.

My Gramin Edition
Feb 28, 2024 Page No. 7
newspaper.pudhari.co.in

सकाळ

# राजगुरुनगरमध्ये 'माझे आनंद पर्यटन' विशेषांकाचे प्रकाशन

**राजगुरुनगर, ता. २९ :** तंत्रज्ञानाच्या युगात मराठी विषयाचे शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांनी वाचन, लेखन, संभाषण, श्रवण ही भाषिक कौशल्ये आत्मसात करून व्याख्याता, निवेदक, सूत्रसंचालक या क्षेत्रात करियरच्या संधी शोधाव्या, असे आवाहन खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील यांनी केले.

हुतात्मा राजगुरू महाविद्यालयातील मराठी विभागाच्या वतीने आयोजित मराठी भाषा गौरव दिनानिमित्त 'माझे आनंद पर्यटन' या विशेषांकाच्या प्रकाशन कार्यक्रमात ते बोलत होते.

बुट्टेपाटील म्हणाले, 'ज्ञान व वाचन यांचा जवळचा संबंध असूनवाचन माणसाला वैचारिकदृष्ट्या समृद्ध करते. विद्यार्थ्यांना वाचनातून मिळालेल्या माहितीचे ज्ञानात रूपांतर करता यायला हवे. वाचनाचा संस्कार जपणारी भावी पिढी घडवण्यासाठी मराठी विभागाने विशेष प्रयत्न केले पाहिजेत.'


सोशल मीडियाच्या आहारी न जाता वाचनसंस्कृती रुजविण्याचे आवाहन प्राचार्य डॉ. एस. एस. पिंगळे यांनी विद्यार्थ्यांना केले. मराठी विभाग प्रमुख डॉ. संजय शिंदे यांनी 'माझे आनंद पर्यटन' या विशेषांकातून विद्यार्थ्यांनी त्यांच्या पर्यटनाच्या आठवणींना उजाळा दिल्याचे सांगितले.

मराठी भाषा गौरव दिनानिमित्त मराठी विभागाच्या वतीने स्वरचित काव्यलेखन, शब्दकोडे सोडवा, काव्यवाचन व निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. बक्षीसप्राप्त विद्यार्थ्यांना पुस्तके भेट देण्यात आली. प्रास्ताविक व सूत्रसंचालन डॉ. शिंदे यांनी केले.

Pune, District-Today
01/03/2024 Page No. 4

HRW

# राजगुरु महाविद्यालयात 'माझे आनंद पर्यटन' या विशेषांकाचे प्रकाशन



■ **राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क**

**राजगुरूनगर :** येथील हुतात्मा राजगुरू महाविद्यालयातील मराठी विभागाच्या वतीने आयोजित मराठी भाषा गौरव दिनानिमित्त "माझे आनंद पर्यटन" या विशेषांकाच्या प्रकाशन झाले. याप्रसंगी खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष अॅड. देवेंद्र बुट्टेपाटील, उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, संचालक शांताराम घुमटकर, डॉ. अनिल खिंवसरा, सुरेश टाकळकर, विजय वाडेकर, बाळासाहेब लिंभोरे, प्राचार्य डॉ. एस. एस. पिंगळे, डॉ. एच. एम. जरे, उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे व कला शाखेतील सर्व विभागप्रमुख व प्राध्यापक उपस्थित होते.

यावेळी मार्गदर्शन करताना अॅड. बुट्टेपाटील म्हणाले की, कीतंत्रज्ञानाच्या युगात मराठी विषयाचे शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांनी वाचन, लेखन, संभाषण, श्रवण ही भाषिक कौशल्य आत्मसात करून व्याख्याता, निवेदक, सूत्रसंचालक या क्षेत्रात करिअरच्या संधी शोधाव्यात. ज्ञान व वाचन यांचा जवळचा संबंध असून वाचन माणसाला वैचारिकदृष्ट्या समृद्ध करते. विद्यार्थ्यांना वाचनातून मिळालेल्या माहितीचे ज्ञानात रूपांतर करता यायला हवे. वाचनाचा संस्कार जपणारी भावी पिढी घडण्यासाठी मराठी विभाग करीत असलेल्या प्रयत्नांबद्दल त्यांनी आनंद व्यक्त केला. प्राचार्य डॉ. एस. एस. पिंगळे यांनी विद्यार्थ्यांना सोशलमीडियाच्या आहारी न जाता वाचनसंस्कृती रूजविण्याचे आवाहन केले.

मराठी विभाग प्रमुख डॉ. संजय शिंदे यांनी माझे आनंद पर्यटन या विशेषांकातून विद्यार्थ्यांनी त्यांच्या पर्यटनाच्या आठवणींना उजाळा दिला असल्याचे सांगितले. मराठी भाषा गौरव दिनानिमित्त मराठी विभागाच्या वतीने स्वरचित काव्यलेखन, शब्दकोडे सोडवा, काव्यवाचन व निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. बक्षीसप्राप्त विद्यार्थ्यांना पुस्तके भेट देण्यात आली. प्रास्ताविक व सूत्रसंचालन डॉ. संजय शिंदे यांनी केले.

# विद्यार्थ्यांनी भाषिक कौशल्ये आत्मसात करावी : देवेंद्र बुट्टेपाटील

**राजगुरूनगर, (वार्ताहर) :** तंत्रज्ञानाच्या युगात मराठी विषयाचे शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांनी वाचन, लेखन, संभाषण, श्रवण ही भाषिक कौशल्ये आत्मसात करून व्याख्याता, निवेदक, सूत्रसंचालक या क्षेत्रात करिअरच्या संधी शोधाव्यात असे आवाहन खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष देवेंद्र बुट्टेपाटील यांनी केले.

ते हुतात्मा राजगुरू महाविद्यालयातील मराठी विभागाच्या वतीने आयोजित मराठी भाषा गौरव दिनानिमित्त 'माझे आनंद पर्यटन' या विशेषांकाच्या प्रकाशन कार्यक्रमात बोलत होते. याप्रसंगी उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, संचालक शांताराम घुमटकर, डॉ. अनिल खिंवसरा, सुरेश टाकळकर, विजय वाडेकर, बाळासाहेब लिंभोरे, प्राचार्य डॉ.एस.एस. पिंगळे, डॉ. एच.एम.जरे, उपप्राचार्य डॉ संजय शिंदे व कला शाखेतील सर्व विभागप्रमुख व प्राध्यापक उपस्थित होते.

देवेंद्र बुट्टेपाटील पुढे बोलताना म्हणाले, ज्ञान व वाचन यांचा जवळचा संबंध असून वाचन माणसाला वैचारिकदृष्ट्या समृद्ध करते. विद्यार्थ्यांना वाचनातून मिळालेल्या माहितीचे ज्ञानात रूपांतर करता यायला हवे. वाचनाचा संस्कार जपणारी भावी पिढी घडण्यासाठी मराठी विभाग करीत असलेल्या प्रयत्नांबद्दल त्यांनी आनंद व्यक्त केला. प्राचार्य डॉ. एस. एस. पिंगळे यांनी विद्यार्थ्यांना समाज माध्यमाच्या आहारी न जाता वाचनसंस्कृती रूजविण्याचे आवाहन केले.

मराठी विभाग प्रमुख डॉ. संजय शिंदे यांनी माझे आनंद पर्यटन या विशेषांकातून विद्यार्थ्यांनी त्यांच्या पर्यटनाच्या आठवणींना उजाळा दिला असल्याचे सांगितले. मराठी भाषा गौरव दिनानिमित्त मराठी विभागाच्या वतीने स्वरचित काव्यलेखन, शब्दकोडे सोडवा, काव्यवाचन व निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले.

**दै. केसरी**

**डॉ. संजय शिंदे**
**प्रसिद्धी विभाग प्रमुख**